

गावकरी 20/06/2022

# अल्पवयीन मुलाकडून चोरीच्या चार दुचाकी जप्त

## वजिराबाद गुन्हे शोध पथकाची कारवाई

**नांदेड-** शहरातील अल्पवयीन चोरट्याकडून चोरलेल्या चार दुचाकी वजिराबाद पथकाने जप्त केल्या. तसेच तिघा अल्पवयीन बालकांना अटक केली.

शहरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याने पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी ( शहर ) सुरज गुरव यांच्या आदेशानुसार यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व गुन्हे शोध पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदारांना गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते.

त्यानुसार पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार यांनी वजिराबाद गुन्हे शोध पथकाचे पोलीस अधिकारी एपीआय शिवराज जमदडे यांना दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांचे घटनास्थळी भेट देऊन तेथील सिसिटीव्ही कॅमेरे तपासून आरोपीतांचा शोध घेण्याबाबत आदेशित केले. त्यानुसार दि. १८ जून रोजी एपीआय शिवराज जमदडे, अंमलदार विजयकुमार नंदे, मनोज परदेशी, बालाजी कदम, शेख ईम्रान, रमेश सूर्यवंशी, भाऊसाहेब राठोड, अरुण साखरे असे दुचाकी चोरट्यांचा शोध घेत असतांना महावीर चौकात एक अल्पवयीन बालक आपल्या ताब्यात विनाक्रमांकाची दुचाकी घेऊन जात असताना सापडला. त्याची चौकशी केली असता सदरची दुचाकी चोरीची असल्याचे स्पष्ट झाले. त्यारून अधिक विश्वासात घेऊन विचारणा केली असता त्यांनी इतर तीन दुचाकी चोरी केल्याचे सांगितले. पोलिसांनी उंबरवरा ता. जळकोट जि. लातूर येथुन एक होंडा शाईन दुचाकी, गाजुर ता. चाकुर जि.लातुर येथून दोन स्प्लेंडर दुचाकी अशा चार दुचाकी हस्तगत केल्या आहेत. कोणाकडे विना कागदपत्र किंवा खोटे आश्वासन देवून दुचाकी खरेदी, विक्री झाली असल्यास त्याची तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याला माहीती देवून दुचाकी जमा कराव्यांत व पोलीस कारवाईपासून दूर राहावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.